वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-शुक्रवार दि. ९ मे २०२५ पाने ४ किंमत ३

# बाबो, बीडमध्येही झाला ना!

# शालार्थ आयडीचा महाघोटाळा




Email:- dailydivyawarta@Gmail.com
Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

## काही संस्था चालकांनी एका सेवानिवृत्त शिक्षणाधिकाऱ्यांच्या सहीचे मान्यता पत्र घेवून शेकडो बनावट शालार्थ आयडी तयारी केले

## शासनाच्या तिजोरीवर कोट्यावधीचा गंडा घालत संस्था चालक व कर्मचाऱ्यांनी लयलूट केली

## जिल्ह्यातील शालार्थ आयडी घोटाळ्याची स्पेशन यंत्रणेमार्फत चौकशी

### काही दिवसात काही संस्थाचालकांसह अधिकारी अडकणार हे शंभर टक्के खरे

बीड, (दिव्य न्यूज) : शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रात शिक्षण संस्थांच्या नावाखाली भ्रष्टाचाराचे आड्डे मांडून बसलेले संस्थाचालक व शिक्षणातले प्रशासकीय अधिकारी यांच्या संगनमताने राज्यभरात शिक्षणाचा काळाबाजार, भ्रष्टाचार व गैरकारभार चालू असतानाच बीड जिल्ह्यात विभागीय शिक्षण उपसंचालक, शिक्षणाधिकारी व संस्थाचालकांनी संगणमतांने एका सेवानिवृत्त शिक्षणाधिकाऱ्यांच्या सह्यांचे मान्यता पत्र घेऊन शेकडो कर्मचाऱ्यांचे बनावट शालार्थ आयडी तयार करत शासनाच्या तिजोरीवर कोट्यावधीचा गंडा घालत शासन, कर्मचारी व जनतेची लयलूट केली आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातल्या शालार्थ आयडी घोटाळ्याची तात्काळ स्पेशल यंत्रणेमार्फत चौकशी करून शालार्थ घोटाळ्यात सामील असलेल्या सन ऋ-घए ऋ-घए २०१५ पासून कार्यरत असलेल्या माध्यमिक व प्राथमिक शिक्षणाधिकारी, बीड जिल्ह्यातल्या विविध शाळांचे मुख्याध्यापक व संस्थाचालकांवर फसवणुकीचे व भ्रष्टाचाराचे गुन्हे दाखल करण्यात यावेत, अशी मागणी राज्याचे मुख्यमंत्री, शालेय शिक्षण मंत्री व शिक्षण आयुक्तांकडे करण्यात आली आहे.

याबाबतचा सविस्तर वृतांत असा की, महाराष्ट्रात सन २०१२ पासून सर्वत्र शिक्षक भरती बंद होती. शिक्षकांच्या वेतनासाठी असलेल्या शालार्थ' प्रणालीवर बीड जिल्ह्यातल्या अनेक नामांकित संस्थांमधून शिक्षकांचे बनावट शालार्थ आयडी तयार करून गेल्या अनेक वर्षांपासून वेतनाची उचल झाली असून, याची पाळेमुळे ही मंत्रालयापर्यंत असल्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे. राज्यात २०१२ पासून सर्वत्र शिक्षक भरती बंद होती, त्यामुळे डी.एड. आणि बी.एड. पात्रताधारकांसाठी अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (टीईटी) सुरू करून, त्यातील उत्तीर्णांची नोंदणी पवित्र पोर्टल 'वर करण्याचा नियम आहे. या पोर्टलवरून मागील वर्षी राज्यात ११ हजार शिक्षकांची भरती करण्यात आली, त्यामध्ये बीड जिल्ह्यातील शिक्षकांच्या भरतीचा देखील मोठा वाटा आहे. परंतु दरम्यानच्या काळात बनावट कागदपत्रे, जुन्या तारखांमध्ये नियुक्त्या दाखवून अनेक शिक्षकांच्या भरतीला मान्यता देण्यात आली असल्याचे उघड झालेले आहे. राज्यातील शासकीय व अनुदानित शाळांची, विद्यार्थ्यांची, शिक्षकांची आणि शैक्षणिक व्यवस्थेची एकत्रित माहिती एका केंद्रित प्रणालीमध्ये संग्रहित ठेवण्याच्या उद्देशाने, तसेच या शाळांमधील शिक्षकांच्या वेतनासाठी शासनाने नोव्हेंबर २०१२ पासून ही शालार्थ प्रणाली सुरू केली. संबंधित शाळेला सर्वप्रथम या प्रणालीवर नोंदणी करावी लागते. त्यानंतर ज्या शिक्षकांची नियुक्ती शाळेत करण्यात आली त्या प्रत्येक शिक्षक /कर्मचाऱ्यांचा स्वतंत्र शालार्थ आयडी' निर्माण केला जातो. नाव, जन्मतारीख, पद, शाळेचे नाव, सेवाज्ञा, शैक्षणिक पात्रता, नियुक्तीची तारीख, बढती, प्रशिक्षण असा तपशील यात असल्याने सेवापुस्तिकेसाठीही याचा फायदा होतो. ही माहिती भविष्यातील वेतनवाढ, बदली, निवृत्ती, इ. प्रक्रियेसाठी उपयोगी पडते. त्यामुळे शालार्थ आयडी' निर्माण करण्याचा अधिकार असणाऱ्या शिक्षण विभागातील अधिकार्याला अधिक महत्त्व असते. शालार्थ आयडी' तयार करण्याचे अधिकार २०१६ ते २०१८ पर्यंत मंत्रालयातील अधिकाऱ्यांना होते. परंतु, २०१९ पासून विभागीय शिक्षण उपसंचालकांकडे हा अधिकार येताच संस्थाचालक व शिक्षणाधिकारी यांनी संगनमताने बनावट कागदपत्रांच्या आधारे बीड जिल्ह्यातील अनेक नामांकित अनुदानित शाळांमध्ये शिक्षक आणि मुख्याध्यापकांची नियुक्ती करून वेतनास पात्र ठरवणारी शालार्थ आयडी' तयार केल्याची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. शालार्थ आयडी' तयार झाल्यावर ती शाळांना आणि त्यानंतर बेतन व भविष्य निर्वाह निधी अधीक्षकांकडून मंजूर करण्यात आली आहेत. उपसंचालक, अधीक्षक आणि संस्थाचालकांमध्ये संगनमत असल्याने कुठलीही शहानिशा न करता वेतनास मंजुरी देण्यात आली असल्याचे चौकशीनंतर उघडकीस येणार आहे. शालार्थ प्रणाली' मध्ये भरण्यात आलेल्या माहितीच्या आधारे प्रत्येक महिन्यात संबंधित शाळेतील शिक्षकाचे वेतनपत्रक तयार करण्यात आलेली आहेत. अनुपस्थिती, रजा आदी बाबींचा विचार करून अंतिम वेतन निश्चित केले जाते. हेच अंतिम वेतन पत्रक पुढे आयएफएमएस' प्रणालीला (एकात्मिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली) ला पाठवले जाते. या प्रणालीद्वारे वेतन मंजूर करून संबंधित शिक्षकाच्या बँक खात्यात जमा केले जाते. बीड जिल्ह्यातील अनेक संस्थेतील अनेक शिक्षकांच्या नियुक्त्या या एका सेवानिवृत्त शिक्षण अधिकाऱ्यांच्या मागील तारखेच्या अप्रोहलचा वापर करून आणि तीन ते पाच वर्षांआधीच्या दाखवून त्यांच तितक्या वर्षांची थकबाकी संस्था चालक, अधीक्षक आ उपसंचालकांनी मिळून लुटल्याची माहिती चौकशी मधून समोर दे आहे. बीड जिल्ह्यातील शालार्थ आयडी घोटाळ्याची तात्काळ सो यंत्रणेमार्फत चौकशी करून या घोटाळ्यात सामील असले संस्थाचालक, शिक्षणाधिकारी व संबंधित शाळांचे मुख्याध्यापक वेतन विभागाचे अध्यक्ष यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.



# बीड नगर परिषदेने शहरातील नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये-शेख निजाम




### पाणीपुरवठा सुरळीत करा विशेष स्वच्छता मोहीम राबवा शहरातील सर्व पथदिवे सुरू करा

बीड, (दिव्य न्युज):- मागील सहा महिन्यापासून बीड शहरांमध्ये नगरपरिषदेच्या नाकर्तेपणामुळे व नियोजन शून्यते मुळे झालेल्या अभूतपूर्व पाणी पुरवठाच्या संदर्भात बीड शहरातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष निर्माण झाला होता त्याच अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शेख निजाम व लोकपत्रकार भागवत तावरे,युवा नेते बळी गवते यांच्या नेतृत्वाखाली बीड नगरपरिषद प्रशासना विरोधात भव्य हंडा मोर्चाचे आयोजन दिनांक ९ मे २०२५ रोजी करण्यात आले होते सदरील मोर्चामध्ये बीड शहरातील सर्वपक्षीय नेते नगरसेवक शेख अमर,मुन्नाभाई इनामदार , सय्यद इलियास, कय्युम इनामदार, आयुब पठाण, सय्यद फहीम,सय्यद आझम ,शेख हमीद,शहबाज कादरी, सत्तार इनामदार,शेख कदीर,शेख जाकीर, सादिक पठाण,शेख पाशा, जयंत वाघ,यांच्या सहित हजारो सुजाण नागरिक व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती




होती सदरील मोर्चा च्या निमित्ताने उपस्थित असलेल्या भारतीय जनता पार्टीचे मा.जिल्हा परिषद अध्यक्ष मीरा ताई गादले, शहराध्यक्ष अशोकजी लोढा ,भारतीय जनता पार्टीच्या अँड संध्याताई राजपूत, नगरसेवक सय्यद इलियास, मुन्ना इनामदार ,रुपाली देशपांडे , पठाण रेहानाताई ,प्रीतताई कुकडेजा, सोनलताई पाटील, आदी आदींनी पाणीपुरवठा स्वच्छता व नगर परिषदेच्या गैरव्यवहार बाबत संबोधित केले यावेळी बोलताना लोकपत्रकार भागवत तावरे यांनी बीड नगर परिषदेमध्ये एकूणच चाललेला निरंकुश गैरव्यवहार व त्यामुळे होणारी बीड शहरातील नागरिकांची हेळसांड या प्रश्नावर आपले सविस्तर मत मांडले व सदरील मोर्चाचे आयोजक शेख निजाम यांनी आपल्या संबोधनांमध्ये बीड नगर परिषदेने आपले कर्तव्य समजून बीड नगरपरिषदेच्या माध्यमातून शहरातील नागरिकांकरिता पायाभूत सुविधा उपलब्ध करून द्यावा ज्यात प्रामुख्याने विस्कळीत असलेला पाणीपुरवठा सुरळीत करून किमान आठ दिवसाला शहराला पाणीपुरवठा करण्यात यावा येणाऱ्या पावसाळ्यापूर्वी बीड शहरात विशेष स्वच्छता मोहीम राबवून युद्ध पातळीवर नालेसफाई व कचऱ्याची विल्हेवाट व व्यवस्थापन करण्यात यावे व बीड शहरातील बंद अवस्थेत असणाऱ्या सर्व पथदिवे चालू करण्यात यावे अशा मागण्या वेळ मुख्याधिकारी नीता अंधारे यांना निवेदनात दिलेल्या मागण्या पालकमंत्री मा.अजित दादा पवार यांच्या सूचनेनुसार मान्य केल्या व तात्काळ आज पासून सुरळीतपणे पाणीपुरवठा व स्वच्छता व ईतर सर्व कामे पूर्ण करून करू अशी ग्वाही शिष्टमंडळास दिली. यावेळी भव्य हंडा मोर्चात मोठ्या संख्येने शहरातील नागरिक उपस्थित होते व यामध्ये महिलांची संख्या मोठ्या प्रमाणात होती

# 'राष्ट्रवादी'च्या एकत्रिकरणाबाबत चर्चा करुनच निर्णय घेणार: खासदार सुप्रिया सुळे

मुंबई, (दिव्य न्युज):- दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत शरद पवार यांनी कोणत्या संदर्भाने वक्तव्य केलेय हे पहावे लागेल. परंतू दोन्ही गट एकत्र आणण्याबाबत मी एकटी निर्णय घेऊ शकत नाही. यासंदर्भात कार्यकर्त्यांशी बोलावे लागणार आहे. सर्वांशी चर्चा करुन मगच निर्णय घेतला जाईल, अशी स्पष्टोक्ती राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी साताऱ्यात दिली. दरम्यान, भारत-पाक युद्धजन्य परिस्थितीत एक जबाबदार भारतीय म्हणून आम्ही पूर्ण ताकतीने भारत सरकार व भारतीय सैन्याच्या पाठीशी आहोत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पदभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रम व जनरल बॉडी सदस्यांच्या बैठकीसाठी खासदार सुप्रिया सुळे आज साताऱ्यात आल्या होत्या. बैठकीनंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.खासदार सुळे म्हणाल्या, पवार साहेबांनी नेमके काय वक्तव्य केलंय याबाबतची मला काहीही माहिती नाही. इन्कम टॅक्स संदर्भातील नवीन कायदा आपल्या देशात येत आहे. त्यासंदर्भातील महत्वाच्या बैठकीत मी काल दिवसभर दिल्लीत होते. त्यामुळे पवार साहेब जे काही बोलले असतील, त्यावर मी काहीही बोलू शकत नाही. त्यांनी कोणत्या संदर्भाने आपले मत मांडलंय याची मला माहिती घ्यावी लागेल. त्यानंतरच मी त्यावर भाष्य करेन, असे त्यांनी स्पष्ट केले.इंडिया आघाडीत समन्वय नाही, असे बोलले जात आहे, याविषयी सुप्रिया सुळे म्हणाल्या, इंडिया आघाडीत लोकसभा, राज्यसभेत चांगला समन्वय आहे. काल सर्व पक्षिय बैठकीसाठी आम्ही सर्वजण एकत्र गेलो होते. त्यावेळी आमच्या सगळ्यांचा निर्णय होता, जो काही भारत सरकार निर्णय घेईल, त्याला जबाबदारी विरोधी पक्ष म्हणून आम्ही पाठींबा दिलेला आहे. यामध्ये कोणतेही राजकारण आम्ही करणार नाही.



दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याच्या निर्णयाबाबत दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांत उत्साह आहे, यावर खासदार सुळे म्हणाल्या, विविध कार्यक्रमांच्या निमित्त दोन्ही गटाचे कार्यकर्ते एकत्र येत असतात. त्यामुळे दुसऱ्याला आनंद देणे हे कार्यकर्त्यांना वाटत असते. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येण्याबाबत मी एकटी निर्णय घेऊ शकत नाही. यासंदर्भात कार्यकर्त्यांशी बोलावे लागणार आहे. खासदार शरद पवार यांनी कोणत्या संदर्भाने वक्तव्य केलंय हे पहावे लागेल. पक्ष संघटनेत काम करताना कोणा एकाला निर्णय घेता येणार नाही. सर्वांशी चर्चा करुनच निर्णय घेतला जाईल.भारत-पाक युद्ध परिस्थितीबाबत त्या म्हणाल्या, सध्या देशात जी परिस्थिती आहे, या परिस्थितीत एक जबाबदार भारतीय म्हणून आम्ही पूर्ण ताकतीने भारत सरकार व भारतीय सैन्याच्या पाठीशी राहणार आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले.

# सफारी गाडीत औषधांसह तलवारही सापडली

### औषधांचा वापर नशेसाठी पोलिसांनी ४१ बाटल्या पकडल्या

बीड, (दिव्य न्युज):- कसल्याही प्रकारचा औषध साठा बाळगण्याचा परवाना किंवा खरेदी केल्याच्या पावत्या नसतांना केवळ त्या औषधांचा वापर नशेसाठी करण्याच्या उद्देशाने तब्बल ४१ बाटल्यांचा साठा केल्या प्रकरणी पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत पोलिसांनी सफारी गाडीमधून औषधांच्या ४१ बाटल्या, तलवार असा एकूण ३ लाख ८ हजार ६९२ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी पेठ बीड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

बीड शहरातील पेठ बीड भागातील गांधी नगर परिसरात सफारी गाडी क्रमांक एम.एच.२३ ई ५३३५ या गाडीची पोलिसांनी झडती घेतली असता त्या गाडीमध्ये विविध कंपन्यांच्या औषधांच्या ४१ बाटल्या आढळून आल्या. त्या औषधांचा वापर नशेसाठी होत असल्याची जाणीव असतांना सुद्धा आरोपीने अशा औषधांचा साठा विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगल्याचे पोलीस कारवाईत आढळून आले. या



कारवाईत सीटाच्या खाली तलवार देखील आढळून आली. पोलिसांनी औषधांच्या बाटल्या, सफारी गाडी आणि तलवार जप्त केली आहे. सदरची कारवाई दि.६ मे रोजी करण्यात आली. पेठ बीड ठाण्याचे पो. नि. अशोक मुदीराज,

# भारताचा प्रहार! पाक रडकुंडीस !!

दिव्य वार्ता

भारताने उधळले ना'पाक' मनसुबे

OPERATION SINDOOR





हारोप ड्रोनने पाकिस्तानमध्ये जाऊन १२ शहरांमध्ये डागले मिसाइल, काही कळायच्या आत अनेक ठिकाणी झाले स्फोट

## पाकिस्तानचे फायटर जेट भारताने पाडले; दिल्लीसह सर्व सीमावर्ती शहरांत ब्लॅकआऊट

# अटॅक!

## कराची, लाहोरसह पाकिस्तानच्या अनेक शहरांवर भारताच्या मिसाइल्सची बरसात

कुरापतखोर पाकवर भारताचा बॉम्ब वर्षाव; अनेक ठिकाणचे हल्ले भारताने परतवले




आधी सिंदूरला धक्का लावला, दहशतवाद्यांनी किंमत मोजली; आता पाकिस्तानची वेळ...





डिफेन्स सिस्टममध्ये एक पाळत ठेवणारे रडार असते. ते त्याच्या कार्यक्षेत्राभोवती एक सुरक्षा क्षेत्र तयार करते. या वर्तुळात क्षेपणास्त्र किंवा इतर शस्त्र प्रवेश करताच, रडार ते शोधतो आणि कमांड व्हेईकलला अलर्ट पाठवतो. इशारा मिळताच, गायडेन्स रडार टार्गेटवर हल्ला करतो.

## भारताचे कवच

### पाकिस्तानी हल्ला हाणून पाडणारी भारताची एस-४०० सिस्टम नेमकी काय आहे?

**नवी दिल्ली :** भारताच्या रशियन बनावटीच्या एस-४०० एअर डिफेन्स सिस्टमने पाकचे हे नापाक प्रयत्न निष्फळ ठरवले. प्रत्युत्तर म्हणून भारताने पाकिस्तानच्या लाहोरमध्ये तैनात असलेल्या एचक्यू-९ एअर डिफेन्स सिस्टमला उडविले. ही सिस्टिम पाकिस्तानने चीनकडून घेतली होती. भारताची एस-४०० एअर डिफेन्स सिस्टीम नेमकी काय आहे हे जाणून घेऊ....




**एस-४०० सिस्टम नेमके काय करते?**

एस-४०० ही एक प्रगत एअर डिफेन्स सिस्टीम आहे, जी हवेतून होणाऱ्या हल्ल्यांना रोखण्यासाठी वापरली जाते. ती शत्रूच्या मिसाईल्स, ड्रोन, रॉकेट लाँचर्स आणि फायटर जेट्सच्या हल्ल्यांना थोपवण्यात प्रभावी आहे.

कमाल वेग: ४८०० मीटर/सेकंद

टार्गेट डिटेक्शन रेंज : ६०० किमी

ऑपरेशनल रेंज : ४० ते ४०० किमी

**किती शक्तिशाली आहे एस-४००?**

डिप्लॉयमेंट टाइम : ५-१० मिनिटे



### एस-४०० सिस्टमची वैशिष्ट्ये :

- रस्त्याद्वारे कुठेही सहज नेता येणे ही याची सर्वात मोठी ताकद आहे.
- यामध्ये ९२ एन ६ ई इलेक्ट्रॉनिकली स्टीअर्ड फेज्ड ॲरो रडार आहे, जे सुमारे ६०० किमी अंतरावरून अनेक टार्गेट्स डिटेक्ट करू शकतो.
- आदेश मिळाल्यानंतर ५ ते १० मिनिटांत हे ऑपरेशनसाठी सज्ज होते.
- एस-४०० च्या एका युनिटमधून एकाच वेळी १६० ऑब्जेक्ट्स ट्रॅक करता येतात आणि एका टार्गेटवर एकाच वेळी २ मिसाईल्स डागता येतात.
- एस-४०० मधील ४०० ही संख्या त्याची रेंज दर्शविते. भारताला मिळालेली सिस्टिम ४०० किमी पर्यंत टार्गेट डिटेक्ट करून अटॅक करू शकते.
- हे ३० किमी उंचीपर्यंतच्या हवाई टार्गेट्सलाही लक्ष्य करू शकते.

### एस-४०० व एचक्यू ९ एडीची तुलना

पाकिस्तानच्या एचक्यू ९ एडीची मारक क्षमता फक्त १२५ किमी आहे. ती फक्त १२८ क्षेपणास्त्रे डागू शकते. तीला तैनात करण्यासाठी ३५ मिनिटे लागतात, तर एस-४०० ला ५ मिनिटांत तैनात केले जाते.

## राजकीय नेत्यांचा संदेश : हम सब एक है



गुरुवारी आयोजित सर्वपक्षीय बैठकीवेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांचा हात धरत काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पाकिस्तान विरोधातील लढ्यात सोबत असल्याची ग्वाही दिली. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर हेही यावेळी उपस्थित होते.

### सर्वपक्षीय बैठकीत सर्वच राजकीय पक्षांची खंबीर भूमिका; ऑपरेशन सिंदूर सुरूच राहणार : संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

# पाकला धडा शिकवा; आमची तुम्हाला साथ

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाममध्ये निरपराध भारतीयांची हत्या करणाऱ्या दहशतवाद्यांना आश्रय देणाऱ्या पाकिस्तानला धडा शिकविण्यासाठी भारत सरकार व लष्कर जी कारवाई करेल त्यास समस्त विरोधी पक्षांनी गुरुवारी सर्वपक्षीय बैठकीत खंबीर पाठिंबा दर्शविला. मंगळवार-बुधवारच्या मध्यरात्री पाकिस्तान आणि व्याप्त काश्मीरमध्ये भारताने राबविलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'ची माहिती संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी बैठकीत दिली. या कारवाईत १०० दहशतवादी मारले गेल्याचे सांगून काही गोष्टी स्पष्टपणे सांगता येत नसतात, असे ते म्हणाले.

दहशतवाद्यांची ठिकाणे लक्ष्य करून केलेली ही कारवाई सुरूच राहील. पाकिस्तानने हल्ला केलाच तर चोख प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशाराही राजनाथ सिंह यांनी दिला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारला पाठिंबा दर्शवून संसदेचे विशेष अधिवेशन बोलाविण्यात यावे, जेणेकरून एक चांगला संदेश जाईल, अशी मागणी केली. पंतप्रधानांनी या बैठकीत यावे असे अपेक्षित होते. ते आले नाहीत, याबद्दल खेद वाटतो, असे खरगे म्हणाले.

### सर्व नेत्यांनी परिपक्वता दाखवली

बैठकीनंतर बोलताना संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू यांनी सांगितले की, सर्वपक्षीय नेत्यांनी बैठकीत परिपक्वता दाखवली. संपूर्ण देश दहशतवादाविरुद्धच्या या लढाईत एकजूट आहे, हा संदेश सर्वांनी दिला.

### इंडिया आघाडीसह सर्वच पक्ष केंद्र सरकार, लष्कराच्या पाठीशी : खरगे

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे बैठकीनंतर म्हणाले, काँग्रेसप्रणीत इंडिया आघाडीसह इतर सर्वच पक्षांचे लोक सरकार आणि लष्कराच्या पाठीशी असल्याचे सर्वांनी निक्षून सांगितले.

### सर्वपक्षीय बैठकीला या नेत्यांची उपस्थिती

संसदेच्या आवारात झालेल्या या सर्वपक्षीय बैठकीत गृहमंत्री अमित शाह, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, आरोग्य मंत्री जे. पी. नड्डा, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू, उद्धवसेनेचे संजय राऊत, शरद पवार गटाच्या सुप्रिया सुळे, शिंदेसेनेचे डॉ. श्रीकांत शिंदे, अजित पवार गटाचे प्रफुल्ल पटेल, 'आप'चे संजय सिंग आणि एआयएमआयएमचे असदुद्दीन ओवेसी यांच्यासह विविध पक्षांचे नेते उपस्थित होते.

**पाकिस्तानची कोंडी करा - ओवेसी :** एमआयएम नेते असदुद्दीन ओवेसी यांनी सरकारला पाठिंबा देत पाकिस्तानची जागतिक पातळीवर कोंडी करावी, अशी मागणी केली.

## हा पाहा पाकिस्तानचा खरा चेहरा



परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दहशतवाद्यांच्या अंत्यसंस्काराचे फोटो दाखवले. ते म्हणाले, 'जर फक्त नागरिक मारले गेले असतील तर दहशतवाद्यांसह (लष्कर-ए-तैयबा कमांडर हाफिज अब्दुल रौफ) लष्करी अधिकाऱ्यांचे फोटो का आले? दहशतवाद्यांना पाकिस्तानी ध्वजात गुंडाळण्यात आले होते.'

### परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी मांडली ठाम भूमिका; भारताने स्वतःहून कोणतीच आक्रमक भूमिका घेतलेली नाही

# तणाव कमी करायची जबाबदारी पाकचीच

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याला चोख प्रत्युत्तर देण्यासाठीच भारताने 'ऑपरेशन सिंदूर' ही कारवाई केली. भारताने स्वत:हून कोणतीही आक्रमक भूमिका घेतलेली नाही. दोन्ही देशांत पाकिस्तानमुळे तणाव वाढला असून, तो कमी करण्याची जबाबदारी त्या देशाचीच आहे, असे भारताच्या परराष्ट्र खात्याचे सचिव विक्रम मिस्री यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत ठामपणे सांगितले.

ते म्हणाले की, पहलगाम हल्ल्याची जबाबदारी स्वीकारलेल्या 'दी रेझिस्टन्स फोर्स' या दहशतवादी संघटनेचा उल्लेख संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या बैठकीत होऊ नये म्हणून पाकिस्तानने आटापिटा केला. भारताने बुधवारी केलेली कारवाई ही दहशतवादी तळांपुरती मर्यादित होती.

पाकिस्तान हा जागतिक दहशतवादाचा केंद्रबिंदू म्हणून बदनाम आहे. दहशतवादी ओसामा बिन लादेन हा कुठे सापडला, हे सर्वांना माहीत आहे. संयुक्त राष्ट्रांनी दहशतवादी म्हणून घोषित केलेले अनेकजण पाकिस्तानात मुक्त संचार करत असतात, असेही मिस्री यांनी यावेळी सांगितले.

### 'पाकिस्तानचे दावे बिनबुडाचे'

भारतीय परराष्ट्र खात्याचे सचिव विक्रम मिस्री म्हणाले की, भारताने नीलम-झेलम धरणावर हल्ला केल्याचा पाकिस्तानचा दावा खोटा, बिनबुडाचा आहे. भारताने फक्त दहशतवादी तळांवरच कारवाई केली. जर पाकिस्तानने अफवा पसरवून त्या आधारे भारताच्या पायाभूत सुविधांवर हल्ला केला तर त्याचे अतिशय गंभीर परिणाम त्या देशाला भोगावे लागतील.




### व्योमिका सिंह, सोफिया कुरेशी यांनी दिली लष्करी कारवाईची माहिती

भारताने बुधवारी, गुरुवारी केलेल्या कारवाईची माहिती देण्यासाठी विंग कमांडर व्योमिका सिंह, कर्नल सोफिया कुरेशी या पत्रकार परिषदेत उपस्थित होत्या. त्यांनी पाकिस्तानने भारतातील विविध शहरांवर केलेला मारा व त्याला भारताने दिलेले चोख प्रत्युत्तर यांची माहिती दिली. ऑपरेशन सिंदूरची माहिती देण्याचे काम या दोन महिला अधिकाऱ्यांवरच बुधवारच्या पत्रकार परिषदेत सोपविले होते.

**'पाकिस्तान जन्मापासून खोटे बोलत आहे' :** मिस्री म्हणाले की, पाकिस्तान त्याच्या जन्मापासून खोटे बोलत आला आहे. १९४७ साली या देशाने जम्मू-काश्मीरवर संयुक्त राष्ट्रांमध्ये दावा केला. तोही खोटा होता.



आयओएस सागर महिनाभराच्या सफरीनंतर कोची येथे दाखल झाली. त्यावेळी व्हाइस ॲडमिरल व्ही. श्रीनिवास यांनी तिचे स्वागत केले.




**बीएलएच्या हल्ल्यात १४ पाकिस्तानी सैनिक ठार :** पाकिस्तानात बलुचिस्तान लिबरेशन आर्मीने (बीएलए) बोलान व केच या दोन भागांत बुधवारी पाकिस्तानी लष्करावर केलेल्या हल्ल्यांत १४ सैनिक ठार झाले. बोलन येथे लष्करी वाहन उडवून दिले. त्यात १२ सैनिक ठार झाले. स्पेशल ऑपरेशन्स कमांडर तारिक इम्रान व सुबेदार उमर फारूक यांचा मृतांत समावेश आहे.

## पाकचा शेअर बाजार ७,००० अंकांनी धडाम्!

१. कराचीनजीक भारतीय लष्कराने कारवाई केल्याच्या अफवा पसरल्यानंतर गुरुवारी पाकिस्तानातील शेअर बाजारात हाहाकार उडाला. 'कराची स्टॉक एक्सचेंज'चा केएसई-१०० निर्देशांक ६,९४८.७३ अंकांनी अर्थात ६.३२ टक्क्यांनी घसरून १,०३,०६०.३० वर आला. त्यामुळे व्यवहार एक तास रोखावे लागले.

२. 'एकेडी सिक्योरिटीज'च्या फातिमा बुचा यांनी सांगितले की, परिस्थिती शांत झाल्यानंतर बाजारातील व्यवहार पुन्हा सुरू करण्यात आले. भारत पाकिस्तानला कसे उत्तर देईल, याबाबत अनिश्चितता आहे. सिमेंट, ऊर्जा, बँक आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांतील कंपन्यांचे समभाग आपटले. त्यामुळे निर्देशांक खाली आला.

३. पाकिस्तान सरकारसमोर आपला विदेशी चलन साठा कायम ठेवण्याचे मोठे आव्हान आहे. त्यासाठी सरकारने केलेल्या तातडीच्या उपाययोजनांत मौल्यवान धातू, अलंकार, रत्ने यांच्या आयात व निर्यातीवर ६० दिवसांचा प्रतिबंध लावण्यात आला. स्टेट बँक ऑफ पाकिस्तानने आंतर-बँक आणि खुल्या चलन व्यवहारांवर नजर ठेवण्याच्या सूचना जारी केल्या आहेत.

### भारतीय गुंतवणूकदारांचे ५ लाख कोटी रुपये बुडाले

व्यवहाराच्या शेवटच्या तासात झालेल्या जोरदार विक्रीमुळे गुरुवारी सेन्सेक्स ४१२ अंकांनी तर निफ्टी १४० अंकांनी घसरला.

शेअर बाजारातील घसरणीमुळे गुंतवणूकदारांचे पाच लाख कोटी रुपये एका दिवसांत बुडाले आहेत. बीएसईवरील २,५४८ शेअर्स तोट्यात बंद झाले तर १,३४९ कंपन्यांचे शेअर्स तेजीत होते.

### पठाणकोटमध्ये अडकले अकोटचे ४० नागरिक

**अकोट (जि. अकोला) :** जम्मू-काश्मीर सीमेवर सुरक्षा यंत्रणांनी ब्लॅक अलर्ट जारी केल्यामुळे अकोट तालुक्यातील सुमारे ४० महिला, पुरुष व लहान मुले पठाणकोटमध्ये अडकले आहेत. सध्या सर्वजण सुरक्षित असून जिल्हा प्रशासनाशी सातत्याने संपर्क सुरू आहे.